# महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद सांगली

**दुरध्वनी क्रमांक ०२३३२३२५९१४** E-mail-icdsdyceo@gmail.com

**कोटेशन मागणी नोटीस**

**जाक्र.जिपंसा/मबाक/आस्था/वशि/२४०/२०२३-२४** दिनांक -२८/२/२०२४

प्रति,

----------------------------------

----------------------------------

विषय :- सन २०२३-२४ या आर्थीक वर्षात जि.प.स्वीय निधीमधून मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रीक प्रशिक्षण- **घनकचरा व्यवस्थापन व बायोगॅस प्रशिक्षण देणे**करिता दरपत्रक सादर करणेबाबत.

जिल्हा परिषद स्वीय निधी सन २०२३-२४ या आर्थीक वर्षात सांगली जिल्हयातील ग्रामीण भागातील महिला व मुलींना व्यावसायिक व तांत्रीक प्रशिक्षण अंतर्गत **घनकचरा व्यवस्थापन व बायोगॅस** प्रशिक्षण देणेकरिता स्थानिक निविदा धारकांकडून खाली नमूद केलेनुसार तांत्रीक व दराचा सिलबंद लखोटा अशा दोन लखोटे पध्दतीने दरपत्रके मागविणेत येत आहेत.

प्रशिक्षणाची जागा ही संबंधित बाल विकास अधिकारी यांचेशी चर्चा करुन निश्चित करणे,त्या ठिकाणी भौतिक सुविधा संस्थेने करणे,प्रशिक्षण साहित्य व कच्च्या मालाची व्यवस्था करणे, लेखन सामुग्री, कोर्सबाबत आवश्यक साहित्य इत्यादी बाबी संस्थेने पुरविणे यासह दरपत्रक मागणी करणेत येत आहे.

**कामाचे नांव -** महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद,सांगली अंतर्गत जिल्हा परिषद,स्वीय निधी मधून सांगली जिल्हयातील ग्रामीण भागातील महिला व मुलींना व्यावसायिक व तांत्रीक प्रशिक्षण अंतर्गत ९० तासांचे घनकचरा व्यवस्थापन व बायोगॅस उत्पादन प्रशिक्षण देणे.

**प्रशिक्षण घेणेचा प्रकल्प** :- १) उमदी - २८ लाभार्थी ( तासगांव -१ लाभार्थी त्यांचे इच्छेनुसार उमदी येथे प्रशिक्षण घेईल ) असे एकुण २९ लाभार्थी

**प्रशिक्षणाचे स्वरुप :-** (१) मानवी जिवनामध्ये स्वच्छतेचे महत्व (२) घनकचरा व सांडपाणी बाबत ओळख (३) घनकचरा व्यवस्थापनाबाबत चित्रफित (४) घनकचरा व्यवस्थापण करणे (५) सार्वजनिक घनकचरा संकलन करणे
(६) घनकचरा व्यवस्थापनेकरिता प्रक्रिया व यंत्रणा (७) घनकचरा व्यवस्थापन उपाययोजना किंवा घेण्यात येणारे घटक उपक्रम
(८) घनकचरा कृती आराखडा माहिती व तयार करण्याची पध्दती. (९) सुका कचरा प्रक्रिया करुन पुनर्वापरास विक्री करणेसाठी इत्यादी
बायोगॅस प्रशिक्षण :- १) कच-यापासून खत निर्मिती २) गांडूळखत तयार करणे व विक्री करणे ३) कच-याचे विभाजन व व्यवस्थापन इत्यादी.

**सादर करावयाची कागदपत्रे (लखोटा क्रमांक १)** :- संस्थेचे शासकिय नोंदणी प्रमाणपत्र २) संस्था कौशल्य विकास विभागाकडे V.T.P. (Vocational Training Provider) म्हणून नोंद असलेचे प्रमाणपत्र ३) संस्थेचे पॅनकार्ड ४) संस्थेचे GST प्रमाणपत्र / सूट असलेस सूट प्रमाणपत्र ५) संस्थेचे मागील तीन वर्षाचे आयकर रिटर्न ६) संस्थेचे मागील तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट ७) शासकिय कामाकाचा अनुभव असलेबाबत आदेशाची प्रत ८) संस्था काळया यादीत नसलेबाबत संस्थेचे हमीपत्र.

**टिप** -१) एका लाभार्थीवर जास्तीत जास्त ५०००/- खर्च करणेत येईल.
२) प्रशिक्षण किंमतीच्या १० टक्के होणारी रक्कम लाभार्थीकडून संस्थेने भरुन घेणे आवश्यक आहे.सदरची होणारी रक्कम देयकातून वजा करुन घेणेत येईल व उर्वरीत देयक अदा करणेत येईल.

**लखोटा क्र.२-** दराचा लखोटा -

| प्रशिक्षणाचे नाव | एकुण दिवस | प्रशिक्षणाचे एकुण तास | ९० तासांचे प्रशिक्षण देणेसाठी प्रति लाभार्थी एकुण दर नमूद करावेत. |
|---|---|---|---|
| घनकचरा व्यवस्थापन व बायोगॅस प्रशिक्षण | आदेशानुसार | ९० | |

वर नमूद केलेनुसार सदर योजनेचे दरपत्रक दिनांक २८/२/२४ ते ७/३/२०२४ या कालावधीत महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद सांगली येथे सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत सादर करणेत यावेत.तदनंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.तसेच सदरची दरपत्रके त्याच दिवशी किंवा कार्यालयाच्या सोयीनुसार उघडणेत येतील.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक)**
**जिल्हा परिषद,सांगली**

**प्रत :-** सदरची कोटेशन मागणी नोटीस कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावणेत यावी.